ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 23 ऑक्टोबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## तिबेटमध्ये 7.0 रिश्टर स्केलचा शक्तिशाली भूकंप; नागरिकांमध्ये घबराट






पान 3 वरुन...
दोन नाट्यगृहे बंद; सांस्कृतिक कार्यक्रमांचे 'वाजले बारा'!

## 'आमच्या नेत्याला बदनाम करण्याचा प्रयत्न'; गुलाबराव पाटील यांचा पलटवार

# जरांगेंच्या ऑडिओ बॉम्बने खळबळ!

**महाईन्यूज । मुंबई**

**मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी ५०० कोटी रुपयांच्या आरोपासंदर्भात पत्रकार परिषदेत कथित ऑडिओ क्लिप सादर केल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. या क्लिपमध्ये जरांगे यांचे आंदोलन बदनाम करण्याच्या कथित कटाचा आणि ५०० कोटी रुपये दिल्याचा उल्लेख असल्याचा दावा करण्यात आला आहे. संभाषणात खासदार श्रीकांत शिंदे यांचे नाव आल्याने भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. या प्रकरणाची सत्यता समोर आणण्यासाठी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, सरसंघचालक मोहन भागवत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून चौकशीची मागणी केली आहे.**



### ५०० कोटींच्या आरोपांवरून राजकीय संघर्ष

मनोज जरांगे यांच्या कथित ऑडिओ क्लिपमुळे भाजप आणि शिंदे शिवसेनेत आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. क्लिपमधील आवाजांची ओळख, संभाषणाची सत्यता आणि कथित आर्थिक व्यवहाराची चौकशी करण्याची मागणी दोन्ही बाजूंकडून होत आहे. फॉरेन्सिक तपासणीतूनच या प्रकरणातील सत्य स्पष्ट होणार आहे.

कथित ऑडिओ क्लिपमध्ये महिलांचे संभाषण असून, जरांगे यांच्यापर्यंत ५०० कोटी रुपये पोहोचल्याचा आणि श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून पैसे दिल्याचा उल्लेख असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, संभाषणातील आवाज कोणाचे आहेत, क्लिपमध्ये फेरफार झाला आहे का आणि त्यातील दाव्यांमध्ये तथ्य आहे का, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. संबंधित व्यक्तींची ओळख पटवून या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर चौकशी करावी आणि सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी रामदास कदम यांनी केली आहे.

शिवसेनेचे मंत्री उदय सामंत यांनी या क्लिपच्या माध्यमातून श्रीकांत शिंदे यांचे नाव गोवून शिवसेना-भाजपमध्ये वाद निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. मंत्री गुलाबराव पाटील यांनीही क्लिपची फॉरेन्सिक तपासणी करून विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. एकनाथ शिंदे आणि त्यांच्या मुलाला बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे का, याचाही तपास व्हावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

### शिंदे आणि शिवसेनेला गोत्यात आणण्याचा डाव

श्रीकांत शिंदें यांचे नाव घेऊन एकनाथ शिंदे आणि शिवसेनेला गोत्यात आणण्याचा डाव असल्याचे गुलाबराव पाटील म्हणाले. याबाबत सखोल चौकशी करुन 'दूध का दूध आणि पाणी का पाणी' होऊ द्या असेही पाटील म्हणाले. यामागे शिवसेना आणि भाजपामध्ये वाद लावण्याचा प्रयत्न आहे का, याचीही मुख्यमंत्र्यांनी चौकशी करावी, असे गुलाबराव पाटील म्हणाले.

दरम्यान, भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनीही या क्लिपची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी केली. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) माध्यमातून बनावट ऑडिओ आणि व्हिडिओ तयार होऊ शकत असल्याने तांत्रिक पडताळणीशिवाय निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. भाजपचे नेते आशिष शेलार यांनी क्लिपचा भाजपशी संबंध नसल्याचे सांगत चौकशीची भूमिका घेतली, तर आमदार अतुल भातखळकर यांनीही एआयच्या काळात बनावट सामग्री तयार होण्याची शक्यता व्यक्त केली.

या प्रकरणामुळे महायुतीतील भाजप आणि शिंदे शिवसेनेच्या संबंधांबाबत राजकीय चर्चेला उधाण आले आहे. दोन्ही बाजूंनी चौकशीची मागणी होत असली, तरी ऑडिओ क्लिपमधील दावे अद्याप सिद्ध झालेले नाहीत. आता या क्लिपची फॉरेन्सिक तपासणी होते का आणि एसआयटी स्थापन करण्याबाबत सरकार काय निर्णय घेते, याकडे लक्ष लागले आहे.

# नवीन मतदारनोंदणीसाठी सर्वाधिक अर्ज

## शिवाजीनगर आणि कसबा पेठ या महत्त्वाच्या मतदारसंघांतील तुलनेने अर्जांची संख्या कमी

**महाईन्यूज । पुणे**

**आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेत (मतदार विशेष पुनरीक्षण मोहीम- एसआयआर) जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदारसंघांमध्ये आतापर्यंत एक लाख १७ हजार ८१८ अर्ज दाखल झाले आहेत. त्यामध्ये नवीन मतदार नोंदणीसाठी सर्वाधिक ८३ हजार ५१४ अर्ज आले असून, मतदारयादीतील तपशील दुरुस्त करण्यासाठी ३२ हजार ८८०, तर नावे वगळण्यासाठी एक हजार ४२४ अर्ज आल्याची माहिती जिल्हा निवडणूक शाखेकडून देण्यात आली.**




दरम्यान, शहरातील शिवाजीनगर आणि कसबा पेठ या महत्त्वाच्या मतदारसंघांतील तुलनेने अर्जांची संख्या कमी असल्यामुळे राजकीय पक्षांसाठी ही बाब चिंतेची ठरण्याची शक्यता आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार जिल्ह्यात मतदार विशेष पुनरीक्षण मोहीम राबविण्यात आली. त्यानंतर मतदारयादीत नव्या मतदारांची नोंदणी करणे, स्थलांतरित मतदारांचे तपशील अद्ययावत करणे आणि पात्र मतदारांची नावे यादीत कायम राहतील याची खात्री करण्याची प्रक्रिया निवडणूक शाखेकडून हाती घेण्यात आली आहे.

मतदारयादी अद्ययावतीकरणासाठी शिरूर विधानसभा मतदारसंघात १० हजार ३८१, तर हडपसरमध्ये १० हजार ५०६ अर्ज दाखल झाले आहेत. वडगाव शेरीमध्ये नऊ हजार ७३, भोरमध्ये नऊ हजार ३९६, चिंचवडमध्ये आठ हजार ४३४ आणि खेड-आळंदीमध्ये आठ हजार ११३ अर्ज आले आहेत. या मतदारसंघांतील अर्जांची संख्या तुलनेने अधिक आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी दिली.

शिरूर आणि हडपसर या दोन्ही मतदारसंघांमध्ये विविध राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा असल्याने मतदार यादीतील नोंदींना विशेष महत्त्व आले आहे. नव्या मतदारांची नोंदणी, विद्यमान मतदारांच्या तपशिलातील दुरुस्ती आणि प्रत्यक्ष मतदार यादीतील नोंदी यांचा निवडणुकीच्या वेळी पक्षांना फायदा होऊ शक्यता आहे. याशिवाय, अर्जांची छाननी करून पात्र मतदारांच्या नोंदी अद्ययावत करण्यावर निवडणूक शाखेकडून भर दिला जात आहे. मतदारयादीतील त्रुटी दूर करण्यासाठी आणि दुबार नोंदी टाळण्यासाठी आवश्यक ती पडताळणी केली जाणार आहे. या प्रक्रियेमुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारयादी अधिक अचूक होण्यास मदत होणार असून, विविध राजकीय पक्षांचेही या मोहिमेतील घडामोडींकडे लक्ष लागले आहे.

### कसबा पेठेतही कमी अर्ज

कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात तीन हजार ६४० अर्ज दाखल झाले आहेत. कोथरूडमध्ये चार हजार ७६२, पर्वतीमध्ये तीन हजार सहा, पुणे कॅन्टोन्मेंटमध्ये तीन हजार ९२९ आणि बारामतीमध्ये तीन हजार ८०० अर्जांची नोंद झाली आहे. जिल्ह्यात दाखल झालेल्या एक लाख १७ हजार ८१८ अर्जांपैकी नवीन मतदार नोंदणीचे अर्ज सर्वाधिक आहेत. मात्र, अर्ज दाखल होणे आणि मतदार यादीत नाव समाविष्ट होणे या वेगवेगळ्या प्रक्रिया आहेत. अर्जांची छाननी, पात्र अर्जांना मंजुरी आणि अंतिम मतदार यादीतील नोंदी यानंतरच प्रत्यक्ष वाढलेल्या मतदारांची संख्या स्पष्ट होईल, असे जिल्हा निवडणूक शाखेकडून स्पष्ट करण्यात आले.

### शिवाजीनगरमध्ये भाजपसमोर प्रश्न

शहरातील शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघात तीन हजार ४४१ अर्ज दाखल झाले आहेत. शहरातील महत्त्वाचा मतदारसंघ आणि मोठ्या शैक्षणिक संस्थांचे केंद्र म्हणून शिवाजीनगरची ओळख आहे. या भागात विद्यार्थी, तरुण आणि उच्चशिक्षित मतदारांची संख्या लक्षात घेता नव्या मतदार नोंदणीसाठी अधिक प्रयत्न होण्याची अपेक्षा असताना अर्जांची तुलनेने कमी आली आहे.

---

# तर 'आरएमसी'वर कारवाई होणार नाही? पुणे महापालिका आयुक्तांनी स्पष्टच सांगितले

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या हद्दीतील 'रेडी मिक्स क्रॉक्रिट प्रकल्पांवर' (आरएमसी) कारवाई करताना अतिरिक्त आयुक्तांना कोणतीही कल्पना न देता बांधकाम विभाग तसेच अतिक्रमण विभागातील अधिकारी थेट कारवाई करीत असल्याने आयुक्त नवल किशोर राम यांनी नाराजी व्यक्त केली आहे. 'आरएमसी' प्रकल्पांवर कारवाई करताना वरिष्ठांना कल्पना द्यावी, अशा सूचना दिलेल्या असतानाही त्याकडे दुर्लक्ष का केले जाते, अशी विचारणा आयुक्त राम यांनी केली आहे.**



महापालिकेच्या हद्दीत असलेल्या बालेवाडी भागातील पाच आरएमसी प्रकल्पांवर गेल्या आठवड्यात महापालिकेने कारवाई करून या प्रकल्पांना सील ठोकले. महापालिका आयुक्तांसह अतिरिक्त आयुक्तांना या बाबत कोणतीही कल्पना न देता ही कारवाई केल्याने याची उलटसुलट चर्चा महापालिकेत झाली. वरिष्ठांना न कळवता कारवाईची कृती करणाऱ्या प्रशासनाला या बाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना आयुक्त राम यांनी शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांना केल्या.

तसेच, यापुढील काळात अशा प्रकल्पांवर कारवाई करताना अतिरिक्त आयुक्तांना त्याची संपूर्ण कल्पना द्यावी, त्यानंतरच कारवाई करावी, अशा सूचनाही दिल्या. ते म्हणाले, 'प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि नागरिकांना त्रासदायी ठरणाऱ्या बेकायदा 'आरएमसी' प्रकल्पांवर कारवाई झालीच पाहिजे. मात्र, हे करताना प्रशासनाने आवश्यक त्या गोष्टींची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देणे आवश्यक आहे. गंभीर स्वरूपाचे उल्लंघन असल्यास कारवाई केली जाईल; मात्र, कारवाईपूर्वी संपूर्ण प्रकरणाची माहिती घेतली जाईल.'

वडगाव धायरी येथे उभारण्यात आलेला आरएमसी प्रकल्प हा ग्रीन बेल्टमधील प्रकल्प असून, या प्रकल्पाचे नदीत सोडले जाणारे सिमेंटमिश्रित पाणी आणि रात्रीच्या वेळी सुरू राहणारे काम अशा तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. नागरिकांकडून होत असलेल्या तक्रारींची पडताळणी करणे आवश्यक आहे. यामध्ये तथ्य आढळल्यास कारवाई केली जाईल. महापालिकेच्या संबंधित विभागाने या प्रकरणात केलेल्या कारवाईची कारणे आणि त्यासाठीच्या प्रक्रियेची सविस्तर माहिती सादर करणे अपेक्षित आहे. तसेच, आरएमसी प्रकल्पांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण आणि पर्यावरणीय हानी रोखण्यासाठी नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांवर कोणताही भेदभाव न करता नियमानुसार कारवाई करण्याचे आव्हान महापालिका प्रशासनासमोर आहे.

### वडगाव – धायरी परिसरातील प्रकल्पांवर कारवाई कधी?

दरम्यान, वडगाव-धायरी परिसरातील 'आरएमसी' प्रकल्पावर कारवाई करण्यासाठी तीन दिवसांपूर्वी पोलिस बंदोबस्ताची मागणी महापालिकेने केली. त्यासाठी बंदोबस्त देखील दिला जाणार होता. मात्र, ऐन वेळी कारवाई थांबविण्यात आली. ज्या प्रकल्पांवर कारवाई होणार होती. मात्र प्रकल्प भारतीय जनता पक्षाच्या आमदाराच्या मुलाशी संबंधित असल्याने कारवाई टाळली जात असल्याचा आरोप राजकीय वर्तुळातून केला जात आहे. मात्र, हा आरोप फेटाळून लावताना आयुक्त राम म्हणाले, 'कोणत्याही लोकप्रतिनिधीने कारवाई थांबविण्यासाठी दबाव आणलेला नाही. या प्रकल्पाने नियमांची पूर्तता केलेली नसेल तर त्यावर कारवाई ही होणारच आहे.

# दोन नाट्यगृहे बंद; सांस्कृतिक कार्यक्रमांचे 'वाजले बारा'!

## संस्थांची तारखांसाठी धावपळ; कार्यक्रम पुढे ढकलण्याची वेळ

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील सांस्कृतिक कार्यक्रमांना नाट्यगृहांच्या अनुपलब्धतेचा फटका बसत आहे. भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह दुरुस्तीसाठी बंद असून, आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह डिसेंबरपर्यंत महापालिकेच्या विकास आराखड्यावरील सुनावणीसाठी आरक्षित करण्यात आले आहे. त्यामुळे नाट्यप्रयोग, शालेय स्पर्धा, पुरस्कार सोहळे आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणाऱ्या संस्थांची गैरसोय होत आहे. उपलब्ध असलेल्या प्रेक्षागृहांवर ताण वाढल्याने अनेक संस्थांना कार्यक्रमांच्या तारखांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.**

### जागा उपलब्ध करून द्या

शहरात सध्या सांस्कृतिक चळवळ वाढत असून, विविध महोत्सव आणि कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. अशा वेळी नाट्यगृहे बंद असल्याने सांस्कृतिक संस्थांचे नुकसान होत आहे. कार्यक्रमांची गैरसोय टाळण्यासाठी महापालिकेने पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा, अशी मागणी थिएटर वर्कशॉप कंपनीचे संचालक प्रभाकर पवार यांनी केली.




### प्रा. मोरे प्रेक्षागृहावर ताण

शहरात नाटकांचे प्रयोग आणि मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाला प्राधान्य दिले जाते. मात्र, या प्रेक्षागृहाची नोंदणी तीन महिने आधीच होत असल्याने संस्थांना अपेक्षित तारखा मिळविणे कठीण झाले आहे. परिणामी, काही कार्यक्रम पुढे ढकलण्याची वेळ आयोजकांवर आली आहे.

औद्योगिकनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पिंपरी-चिंचवडमध्ये सांस्कृतिक चळवळीला चालना देण्यासाठी महापालिकेने विविध भागांत नाट्यगृहे आणि प्रेक्षागृहे उभारली आहेत. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, भोसरीतील कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, निगडी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, पिंपरीतील आचार्य अत्रे रंगमंदिर आणि सांगवीतील नटसम्राट निळू फुले रंगमंदिर ही सांस्कृतिक उपक्रमांची प्रमुख केंद्रे आहेत.

मात्र, सध्या दोन नाट्यगृहे उपलब्ध नसल्याने कार्यक्रमांच्या नियोजनात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृहात गळती, खुर्च्यांची दुरवस्था आणि ध्वनिवर्धक यंत्रणेतील बिघाड यांमुळे दुरुस्तीचे काम सुरू आहे. हे काम पूर्ण होण्यासाठी आणखी महिनाभराचा कालावधी लागण्याची शक्यता महापालिकेच्या क्रीडा विभागाने व्यक्त केली आहे. दुसरीकडे, ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात ऑगस्टपासून विकास आराखड्यावरील हरकतींच्या सुनावण्या सुरू आहेत. त्यासाठी डिसेंबरपर्यंत नाट्यगृह आरक्षित करण्यात आले आहे.

दरम्यान, चिखली टाऊन हॉल, सांगवीतील नटसम्राट निळू फुले रंगमंदिर आणि पिंपरीतील आचार्य अत्रे रंगमंदिर हे पर्याय उपलब्ध असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. लांडगे नाट्यगृहाच्या दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल, असे महापालिकेच्या क्रीडा विभागाचे उपायुक्त पंकज पाटील यांनी सांगितले. आता प्रशासन दुरुस्तीचे काम किती लवकर पूर्ण करते आणि सांस्कृतिक संस्थांसाठी पर्यायी व्यवस्था कशी उभी करते, याकडे आयोजकांचे लक्ष लागले आहे.

# फटाका स्टॉलसाठी २३ अर्ज; मंजुरी मात्र एकालाच!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**दिवाळीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरात फटाका विक्रीचे स्टॉल उभारण्यासाठी महापालिकेची परवानगी आणि अग्निशामक विभागाचा ना हरकत दाखला (एनओसी) घेणे बंधनकारक आहे. विनापरवाना फटाका विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा महापालिकेच्या अग्निशामक विभागाने दिला आहे. आतापर्यंत स्टॉलच्या परवानगीसाठी २३ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी एकालाच परवानगी देण्यात आली आहे.**



### परवानगीसाठी किती शुल्क?

फटाका विक्री स्टॉलच्या जागेनुसार अग्निशामक विभागाकडून दोन ते अडीच हजार रुपये शुल्क आकारले जाते. स्टॉल उभारण्यापूर्वी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाची परवानगी आणि अग्निशामक विभागाचा ना हरकत दाखला घेणे आवश्यक आहे.

गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवानंतर आता दिवाळीच्या तयारीला वेग आला आहे. या काळात शहरातील विविध भागांत फटाका विक्रीचे स्टॉल उभारले जातात. मात्र, अनेक विक्रेते आवश्यक परवानग्या न घेताच व्यवसाय सुरू करतात. याला आळा घालण्यासाठी महापालिकेच्या अग्निशामक विभागाने शहरातील दहाही क्षेत्रीय कार्यालयांच्या अधिकाऱ्यांना पत्र पाठवून त्यांच्या कार्यक्षेत्रातील फटाका विक्री स्टॉलची तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

फटाका विक्रीसाठी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाची परवानगी आणि अग्निशामक विभागाचा ना हरकत दाखला आवश्यक आहे. परवानगी देण्यापूर्वी संबंधित जागेची पाहणी केली जाते. स्टॉलच्या जागेनुसार अग्निशामक विभागाकडून दोन ते अडीच हजार रुपये शुल्क आकारले जाते. आवश्यक परवानग्या न घेतलेल्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याच्या सूचना अतिक्रमण विभागाला देण्यात आल्या आहेत. गेल्या वर्षी शहरात मोठ्या संख्येने फटाका विक्रीचे स्टॉल उभारण्यात आले होते. मात्र, त्यापैकी केवळ १०० विक्रेत्यांनी महापालिकेची अधिकृत परवानगी घेतली होती. त्यामुळे यंदा परवानगी प्रक्रियेवर आणि नियमांच्या अंमलबजावणीवर भर देण्यात येत आहे.

फटाका विक्रीचा व्यवसाय करताना नियमांचे पालन करावे आणि कोणत्याही परिस्थितीत विनापरवाना स्टॉल उभारू नयेत, असे आवाहन महापालिकेच्या अग्निशामक विभागाचे उपायुक्त व्यंकटेश दुर्वास यांनी केले आहे.

### स्टॉलधारकांसाठी नियम

फटाका विक्रीचा स्टॉल उभारण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाची परवानगी आणि अग्निशामक विभागाचा ना हरकत दाखला आवश्यक आहे. स्टॉलजवळ वाळू व पुरेशा पाण्याची व्यवस्था ठेवावी. परिसरात बिडी-सिगारेट पेटवू नये, ज्वलनशील पदार्थ ठेवू नयेत आणि लहान मुलांना स्टॉलपासून दूर ठेवावे. विनापरवाना स्टॉल उभारल्यास कारवाई करण्यात येणार आहे.

### महापालिकेकडून स्टॉलची तपासणी

महापालिकेच्या अग्निशामक विभागाने शहरातील दहाही क्षेत्रीय कार्यालयांच्या अधिकाऱ्यांना फटाका विक्री स्टॉलची पाहणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. स्टॉलधारकांनी आवश्यक परवानगी आणि ना हरकत दाखला घेतला आहे का, याची तपासणी केली जाणार आहे. विनापरवाना स्टॉल आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.



## भूमिका

**दुष्काळाच्या झळा तीव्र होत असताना शेतकऱ्यांच्या पिकांबरोबरच पशुधनाचे संरक्षण करणे हेही शासनासमोरील मोठे आव्हान आहे. जनावरे ही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहेत. दूध उत्पादन, शेतीची कामे आणि पशुपालकांचे उत्पन्न या सर्वांचा संबंध पशुधनाशी आहे.**

# चारा छावणी की अनुदान? पशुधन संरक्षणाला प्राधान्य हवे!



त्यामुळे दुष्काळात जनावरांसाठी चाऱ्याची व्यवस्था करणे म्हणजे केवळ पशुसंवर्धन नव्हे, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा टिकविण्याचा प्रयत्न होय. अशा परिस्थितीत चारा छावण्या सुरू कराव्यात, पशुपालकांना थेट अनुदान द्यावे की चारा डेपो उभारावेत, याचा निर्णय घेताना स्थानिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे.

चारा उपलब्ध असूनही वाढलेल्या किमतींमुळे पशुपालकांना तो खरेदी करणे शक्य होत नसेल, तर जनावरांच्या संख्येनुसार थेट अनुदान देणे उपयुक्त ठरू शकते. यामुळे पशुपालकांना आपल्या सोयीनुसार चारा खरेदी करता येईल. जनावरांना दूरवरच्या छावण्यांमध्ये नेण्याचा त्रासही वाचेल. शिवाय छावण्यांसाठी लागणारा निवारा, पाणी, स्वच्छता, मनुष्यबळ आणि सुरक्षा यांवरील खर्च कमी होऊ शकतो. मात्र, स्थानिक बाजारात चारा उपलब्धच नसेल, तर खात्यात जमा झालेले अनुदान जनावरांची भूक भागवू शकणार नाही. त्यामुळे आर्थिक मदतीसोबत चाऱ्याची प्रत्यक्ष उपलब्धताही महत्त्वाची आहे.

चाऱ्याची टंचाई असलेल्या, परंतु वाहतुकीद्वारे चारा आणणे शक्य असलेल्या भागांत चारा डेपोचा पर्याय प्रभावी ठरू शकतो. ग्रामपंचायती, सहकारी संस्था आणि सेवाभावी संघटनांच्या सहभागातून असे डेपो चालविता येतील. मात्र, चारा खरेदी, साठवणूक, वितरण आणि दरनिश्चिती यांमध्ये पारदर्शकता आवश्यक आहे. यापूर्वी चारा छावण्यांबाबत आर्थिक गैरव्यवहारांच्या तक्रारी झाल्याने अशा योजनांवर विश्वास टिकविण्यासाठी काटेकोर देखरेख गरजेची आहे.

दुसरीकडे, चाऱ्याची तीव्र टंचाई असून बाहेरून चारा आणणेही शक्य नसेल, तर चारा छावण्या उभारण्याशिवाय पर्याय उरत नाही. मात्र, छावण्यांमध्ये जनावरांच्या संख्येनुसार चारा, स्वच्छ पाणी, पशुवैद्यकीय तपासणी, लसीकरण आणि आवश्यक उपचारांची व्यवस्था असली पाहिजे. गर्दीमुळे संसर्गजन्य रोगांचा धोका वाढू नये, यासाठीही विशेष काळजी घ्यावी लागेल. या संपूर्ण प्रक्रियेत जनावरांची डिजिटल नोंदणी आणि कानातील बिल्ल्यांच्या माध्यमातून ओळख निश्चित करणे उपयुक्त ठरू शकते. भारत पशुधन प्रणालीतील नोंदींच्या आधारे पात्र पशुपालकांपर्यंत मदत पोहोचविणे अधिक सुलभ होईल. त्याचबरोबर चारा उपलब्धता, बाजारभाव, पाण्याची स्थिती आणि वाहतूक व्यवस्थेचा नियमित आढावा घेणे आवश्यक आहे.

दुष्काळ निवारणासाठी एकच उपाय सर्वत्र लागू करण्याचा आग्रह सोडावा लागेल. जिथे चारा उपलब्ध आहे, तिथे थेट अनुदान; जिथे चारा कमी आहे, तिथे चारा डेपो; आणि जिथे चाऱ्याची तीव्र टंचाई आहे, तिथे चारा छावण्या, असे परिस्थितीनुसार लवचीक धोरण स्वीकारावे. प्रशासकीय सोय किंवा खर्चातील बचत यापेक्षा पशुधनाचे संरक्षण महत्त्वाचे आहे. कारण जनावरे वाचली, तरच पशुपालकांचे उत्पन्न टिकेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार मिळेल.

## प्रासंगिक »

# न दिसणारा पूल

**एका गावाजवळ खोल दरी होती. दरीच्या पलीकडे एक छोटी वस्ती होती. पावसाळ्यात नदीला पूर आल्यामुळे दोन्ही गावांतील संपर्क तुटायचा. त्यामुळे आजारी माणसांना मदत पोहोचवणेही कठीण व्हायचे.**

एकदा गावात नवीन अभियंता आला. त्याने पूल बांधण्याची योजना मांडली. काही गावकऱ्यांनी खर्चाचे कारण देत विरोध केला. मात्र, एका वृद्ध शेतकऱ्याने सांगितले, "आज आपल्याला खर्च दिसतोय; पण उद्या याच पुलामुळे कित्येकांचे आयुष्य सोपे होईल."

अभियंत्याने गावकऱ्यांना एकत्र आणले. काहींनी दगड दिले, काहींनी श्रमदान केले, तर काहींनी बांधकामासाठी पैसे जमा केले. अनेक दिवसांच्या मेहनतीनंतर पूल तयार झाला. काही महिन्यांनी मुसळधार पाऊस पडला. नदीला पूर आला; पण पुलामुळे रुग्णवाहिका वेळेत वस्तीपर्यंत पोहोचली आणि एका गंभीर आजारी व्यक्तीचे प्राण वाचले.

त्या दिवशी गावकऱ्यांना जाणवले की त्यांनी केवळ नदीवर पूल बांधला नव्हता, तर माणुसकीचा मार्गही खुला केला होता.

- तात्पर्य : सामूहिक प्रयत्नांतून उभे राहिलेले कार्य अनेकांच्या जीवनात आशेचा मार्ग निर्माण करते.

कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीने सहकार क्षेत्रातील सत्तासमीकरणांबरोबरच राज्याच्या राजकारणातही चर्चेला नवे वळण दिले आहे.

# गोकुळचा कौल; सत्तेपेक्षा मतदारांचा विश्वास मोठा!




हजारो कोटींची उलाढाल असलेल्या या संस्थेच्या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांची मोठी राजकीय ताकद आणि विरोधकांची मर्यादित संख्या यांतील अंतर स्पष्ट दिसत होते. तरीही सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने २५ पैकी १३ जागा जिंकून बहुमत मिळविले. या निकालाने सत्तेची ताकद आणि मतदारांचा विश्वास या दोन वेगवेगळ्या गोष्टी असल्याचे पुन्हा अधोरेखित केले.

गोकुळच्या निवडणुकीला केवळ सहकारी संस्थेची निवडणूक म्हणून पाहता येणार नाही. दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित, संस्थेवरील नियंत्रण आणि जिल्ह्यातील राजकीय वर्चस्व या मुद्द्यांचा त्यात महत्त्वाचा वाटा होता. हसन मुश्रीफ आणि सतेज पाटील यांच्यातील पूर्वीची राजकीय जवळीक, त्यानंतर बदललेली समीकरणे आणि महायुतीतील अंतर्गत मतभेद यांनी निवडणुकीचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे केले. स्थानिक प्रश्नांवरून निर्माण झालेली नाराजी विरोधकांनी संघटितपणे मांडली, तर सत्ताधाऱ्यांना आपल्या ताकदीचा अपेक्षित फायदा घेता आला नाही.

या निवडणुकीत संस्थेच्या व्यवहारांबाबतचे आरोप, 'हलाल सर्टिफिकेट'चा वाद, 'बॉयकॉट गोकुळ' मोहिमेची भीती आणि सभासदांच्या मताधिकाराचा प्रश्न चर्चेत राहिला. सुमारे १,४०० संस्थांचे ठराव रद्द करण्याच्या प्रयत्नामुळे निर्माण झालेला असंतोषही महत्त्वाचा ठरला. मताधिकार टिकविण्यासाठी सभासदांना न्यायालयीन लढाई लढावी लागणे, हा सहकार व्यवस्थेतील पारदर्शकतेविषयी गंभीर प्रश्न उपस्थित करणारा मुद्दा आहे. अशा आरोपांची सत्यता स्वतंत्रपणे तपासणे आवश्यक असले, तरी सभासदांचा विश्वास डळमळीत होणे कोणत्याही संस्थेसाठी हिताचे नाही. प्रचारातील भाषाही निकालाच्या चर्चेत महत्त्वाची ठरली. सर्व मतदार आपल्याच बाजूने आहेत, असा आत्मविश्वास व्यक्त करणे आणि विरोधकांना कमी लेखणे यामुळे मतदारांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात. दुसरीकडे, शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणे आणि त्यांच्या प्रश्नांना महत्त्व देणे विरोधकांसाठी लाभदायक ठरू शकते. मात्र, निवडणुकीतील विजय टिकविण्यासाठी भावनिक आवाहनापेक्षा ठोस कामगिरी महत्त्वाची असते.

कोल्हापूरच्या 'दूध पॅटर्न'मधून सहकार क्षेत्रातील सर्वच राजकीय पक्षांनी धडा घेण्याची गरज आहे. सभासदांचा मतदानाचा अधिकार, संस्थेची आर्थिक पारदर्शकता, दूध उत्पादकांचे हित आणि लोकशाही पद्धतीने निर्णय घेण्याची प्रक्रिया यांना सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. अखेरीस, मोठी राजकीय यंत्रणा किंवा सत्तेचा प्रभाव नव्हे, तर सभासदांचा विश्वास हीच सहकारी संस्थेची खरी ताकद असते. हा विश्वास जपणाऱ्यांनाच भविष्यात मतदारांचा पाठिंबा मिळू शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



न करीं रे संग राहें रे निश्चळ ।
लागों नेदीं मळ ममतेचा ॥१॥

या नांवें अद्वैत खरें ब्रम्हज्ञान ।
अनुभवावांचून बडबड ते ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिंदेंना अटक करण्याची काँग्रेसची मागणी

## जरांगे यांनी ऐकवलेल्या क्लिपमध्ये बोलणारे लोक भाजपाचेच

**महाईन्यूज । मुंबई**

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांना तातडीने अटक करा, अशी आक्रमक मागणी काँग्रेसने केली... मनोज जरांगे पाटील यांनी ऐकवलेल्या क्लिपमध्ये बोलणारे भाजपाचेच लोक असल्याचा गंभीर आरोप शिंदे गटातील नेत्याने केला... विधान परिषद निवडणुकीच्या पूर्वसंध्येला वर्ध्यातील नितेश कराळे यांची शरद पवार गटातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात आली. माजी मंत्री परिणय फुके यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावर केलेल्या घणाघाती टीकेवरून मनसैनिकांनी आक्रमक पवित्रा घेतला**



त्यामुळे ईडीने त्यांच्या आरोपांची सखोल चौकशी करायला हवी. तसेच या प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांचे नाव असल्यामुळे त्यांना तातडीने अटक करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. त्यांच्या या मागणीवर आता शिंदे गटाकडून काय प्रतिक्रिया दिली जाणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी ऐकवलेल्या क्लिपमध्ये बोलणारे लोक भाजपाचेच असल्याचा गंभीर आरोप शिंदे गटाच्या नेत्याने केला. मनोज जरांगे यांच्या आरोपानंतर शिंदेसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी तातडीने पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले की, सदरील ऑडिओ क्लिप दोन-अडीच वर्षांपूर्वीची आहे. ती आताच कशी बाहेर आली. त्यानंतर लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका झाल्या आहेत. तेव्हा ही क्लिप बाहेर का आली नाही. अर्थात या क्लिपमध्ये जे तीन-चार लोक बोलत आहेत, ते भाजपाचेच आहेत. त्यात दुमत नाही हे मी स्पष्टपणे सांगत आहे. क्लिपमधील लोक कॉन्फरन्सवर बोलत आहेत. त्यांच्या बोलण्यात छत्रपती संभाजीनगर, ठाणे, मुंबई यांचे कनेक्शन आहे. कॉन्फरन्स कॉलमध्ये कुणीही हजार-पाचशे कोटी दिले बोलू शकतो. त्याला शेंडा ना बुडखा नाही, असाही दावाही कदम यांनी केला. त्यांच्या या आरोपावर भाजपाचे नेते आक्रमक होण्याची शक्यता आहे.

विधान परिषद निवडणुकीच्या पूर्वसंध्येला वर्ध्यातील नितेश कराळे यांची शरद पवार गटातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात आली. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार ॲड. अभिजीत वंजारी यांच्या विरोधात कराळे यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवला होता. त्यामुळे पक्षशिस्तीचे उल्लंघन आणि महाविकास आघाडीच्या निर्णयाविरोधात भूमिका घेतल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. कराळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली होती. या भेटीदरम्यान पवार यांनी नागपूर विभागाची जागा महाविकास आघाडीत काँग्रेसला मिळाल्याचे स्पष्ट केले होते. तरीही कराळे यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने पक्षाच्या भूमिकेच्या विरोधात जाण्याचा प्रकार घडल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसकडून सांगण्यात आले. तसेच, शरद पवार यांचा आपल्याला पाठिंबा असल्याचा संभ्रम मतदारांमध्ये निर्माण केला जात असल्याचा आरोपही पक्षाने केला आहे.

### नवीन व्होल्वो बसवर एसटीचा लोगो

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज पत्रकार परिषद घेऊन खळबळजनक ऑडिओ क्लिप ऐकवली. या ऑडिओ क्लिपमध्ये शिंदेसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्फत मनोज जरांगेंना ५०० कोटी रुपये पोहोचवल्याचा उल्लेख आहे. यावरून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला आहे. मनोज जरांगे यांनी आज ५०० कोटी रुपयांच्या आरोपांचा पुरावा दिला आहे.

# साकीनाक्यातील आगीत दोघांचा होरपळून मृत्यू; चौघे जण गंभीर

**महाईन्यूज । मुंबई**

**अंधेरी पूर्व येथील साकीनाका, खैराणी रोडवरील एका व्यावसायिक व निवासी संकुलाला मंगळवारी सायंकाळी लागलेल्या भीषण आगीत दोन जणांचा होरपळून मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. जखमींवर घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अग्निशमन दलाने शर्थीचे प्रयत्न करून मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास ही भीषण आग आटोक्यात आणली.**




### मध्यरात्री आग आटोक्यात

ऑपरेशनदरम्यान घटनास्थळावरून दोघांचे पूर्णपणे जळालेले मृतदेह हाती आले. हे मृतदेह शवविच्छेदनासाठी राजावाडी रुग्णालयात पाठवण्यात आले असून मृतांची ओळख पटवण्याचे काम पोलीस करत आहेत. मध्यरात्री १२.३० वाजता ही आग पूर्णपणे विझवण्यात यश आले. सदर आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून अग्निशमन दल आणि पोलीस याप्रकरणी पुढील तपास करत आहेत. या दुर्घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आगीच्या घटनेमुळे मोठे नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, मृतांची ओळख पटवून आगीचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून सर्व बाजूंनी तपास केला जात आहे.

खैराणी रोडवरील अब्दू रशीद कंपाऊंडमधील तळमजला अधिक एक मजली गाळे व चाळींमध्ये मंगळवारी सायंकाळी सव्वासहाच्या सुमारास आग भडकली. सुरुवातीला काही दुकानांपुरती मर्यादित असलेली ही आग बघता-बघता सुमारे ६० ते ७० व्यावसायिक गाळे आणि घरांमध्ये पसरली. आगीची तीव्रता लक्षात घेऊन अग्निशमन दलाने सायंकाळी ६.३७ वाजता 'लेव्हल-२' आग जाहीर केली.

घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर तयार गार्मेंट, प्लॅस्टिक दाणे, भंगार, लाकडी फर्निचर, रिकामे ॲरोसॉल कंटेनर्स आणि एलपीजी सिलिंडरचा साठा असल्याने आगीने रौद्ररूप धारण केले. तसेच रस्त्यावर उभी असलेली दोन दुचाकी वाहने आणि एक टेम्पोही या आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.

अग्निशमन दलाचे जवान, स्थानिक पोलीस, वीज वितरण कंपनीचे कर्मचारी आणि महानगरपालिकेच्या स्थानिक विभाग कार्यालयाचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. आठ फायर इंजिन, सहा जंबो टँकर्स आणि इतर विशेष उपकरणांच्या मदतीने आग विझवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले.

अग्निशमन दल पोहोचण्यापूर्वीच स्थानिक नागरिक व पोलिसांनी जखमींना तातडीने राजावाडी रुग्णालयात दाखल केले. या दुर्घटनेत जाहिद अबिदुल्ला कुरेशी (२०, ४० टक्के भाजलेले), तौफिक शादिलाल कुरेशी (२०, ८० टक्के भाजलेले), लालचंद रामलखन गौतम (४०, १० टक्के भाजलेले) आणि कमाल जलालुद्दीन शाह (४२, ४० टक्के भाजलेले) हे चौघे जखमी झाले असून त्यांच्यावर ट्रॉमा वॉर्डमध्ये उपचार सुरू आहेत.

# सीजेपीच्या आंदोलनाशी माझा संबंध नाही

## ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या (AISA) राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा यांचा उच्च न्यायालयात मोठा दावा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात दिल्लीत मागील काही दिवसांपासून कॉक्रोच जनता पार्टीच्यावतीने आंदोलन करण्यात येत आहे. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. या मागणीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीच्यावतीने मोठ्या प्रमाणात आंदोलन आणि मोर्चे काढण्यात आले आहेत. ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या (AISA) राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा यांच्या नेतृत्वात देखील आंदोलन करण्यात आलं आहे.**



दरम्यान, कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात दिल्लीतील कॅनॉट प्लेसमध्ये १६ ऑक्टोबर रोजी आंदोलन करण्यात आलं होतं. मात्र, या आंदोलनातून आता नेहा बोरा यांनी स्वतःला वेगळं करत सीजेपीच्या आंदोलनाशी आपला कोणताही संबंध नसल्याचा दावा उच्च न्यायालयात केला आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

यावेळी नेहा बोरा यांच्यावतीने न्यायालयात बाजू मांडताना ज्येष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी न्यायालयाला सांगितलं की, कनॉट प्लेस, सेंट्रल पार्क येथे 'सीजेपी'ने पुकारलेल्या आंदोलनात नेहा बोरा यांचा सहभाग नव्हता. त्यामुळे सेंट्रल पार्क येथील आंदोलनाशी बोरा यांचा काहीही संबंध नाही. जेव्हा सेंट्रल पार्क येथे आंदोलन सुरू होतं, तेव्हा नेहा बोरा या मंडी हाऊस येथे स्वतःच्या आंदोलनाचं नेतृत्व करत होत्या, असं त्यांनी न्यायालयात सांगितलं.

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी दिल्लीत तिरंगा मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. त्या दरम्यान नेहा बोरा यांनी सायंकाळी ५:१५ वाजता मंडी हाऊस येथून 'एआयएसए'च्या कार्यकर्त्यांबरोबर तिरंगा मोर्चाला सुरुवात केली होती. पण तेव्हा त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. त्यानंतर १२ तासांनी शनिवारी पहाटे ६ वाजता बोरा यांची सुटका करण्यात आली होती. दिल्लीच्या रस्त्यांवर पोलिसांसोबत सुरू असलेला पाठलाग, जंतर-मंतरकडे कूच करताना झालेली धरपकड आणि अटकेत असतानाही इन्स्टाग्रामवरून तरुणांना आंदोलनाची दिशा दाखवणारी, सोशल मिडियावर 'शेरनी' (Sherni) म्हणून प्रसिद्ध झालेली २९ वर्षीय नेहा बोरा सध्या भारतातील विद्यार्थी राजकारणाचा सर्वात आक्रमक चेहरा ठरली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी 'सीजेपी' (कॉक्रोच जनता पार्टी) आणि विरोधी पक्षांनी पुकारलेल्या आंदोलनात नेहाने ज्या प्रकारे पोलिसांच्या लाठ्याकाठ्यांचा सामना केला, त्यानंतर ती केवळ एक विद्यार्थी नेता राहिलेली नाही, तर 'इंडिया' आघाडीच्या (INDIA Bloc) सर्वोच्च नेत्यांबरोबर विशेषतः राहुल गांधींसोबत सर्वोच्च न्यायालयाकडे काढलेल्या मोर्चात खांद्याला खांदा लावून चालणारं एक महत्त्वाचं राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून पुढे आली आहे.

या प्रकरणामुळे दिल्लीतील विद्यार्थी आंदोलन आणि राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. नेहा बोरा यांनी न्यायालयात मांडलेल्या भूमिकेमुळे त्यांच्या आंदोलनातील सहभागाबाबतचा मुद्दा महत्त्वाचा ठरला आहे. एका बाजूला कॉक्रोच जनता पार्टीने पुकारलेले आंदोलन, तर दुसऱ्या बाजूला मंडी हाऊस येथून काढण्यात आलेला तिरंगा मोर्चा, यामुळे या घटनांकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे. पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतरही नेहा बोरा सोशल मीडियावर सक्रिय असल्याची बाब चर्चेत आली आहे. विद्यार्थी राजकारणात सोशल मीडियाचा वाढता प्रभाव या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाला आहे. आंदोलनादरम्यान नेमकी कोणाची भूमिका काय होती, याबाबत न्यायालयात मांडण्यात आलेली बाजू महत्त्वाची ठरणार आहे. तसेच, या आंदोलनाचा पुढील राजकीय घडामोडींवर काय परिणाम होतो, याकडेही राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, नेहा बोरा आणि कॉक्रोच जनता पार्टी यांच्यातील संबंधांबाबतचा वाद न्यायालयीन सुनावणीच्या पार्श्वभूमीवर चर्चेचा विषय ठरला आहे.

### नेहा बोरा यांनी काय दावा केला?

'एआयएसए'च्या अध्यक्षा नेहा बोरा यांनी गुरुवारी दिल्ली उच्च न्यायालयात सांगितलं की, १६ ऑक्टोबर रोजी सीजेपीने सेंट्रल पार्क येथे केलेल्या आंदोलनाशी आपला कोणताही संबंध नव्हता. दरम्यान, दिल्ली पोलिसांनी नेहा बोरा यांना १०,००० रुपयांच्या वैयक्तिक बॉण्डवर त्यांचं म्हणणं माडण्याचे निर्देश दिले होते. या नोटीसला आव्हान देणाऱ्या याचिकेवर उच्च न्यायालयात आज सुनावणी पार पडली.

# रशियानं झटक्यात विकलं ६२००० किलो सोनं! रिकामं करतोय सुवर्णभंडार

**महाईन्यूज । रशिया**

**जगभरात सोन्याकडे सुरक्षित गुंतवणुकीचा उत्तम पर्याय म्हणून बघितले जाते. मात्र, दुसऱ्या बाजूला 'बँक ऑफ रशिया'च्या ताज्या आकडेवारीनुसार, रशियाने केवळ सप्टेंबर महिन्यातच तब्बल ६.२ टन अर्थात सुमारे ६२००० किलो सोने विकले आहे. सातत्याने सुरू असलेल्या या विक्रीमुळे रशियाचा सुवर्णभंडार घसरून २२६४ टन म्हणजेच, ७२.८ दशलक्ष ट्रॉय औंसवर आला आहे. महत्वाचे म्हणजे, २०१९ च्या उत्तरार्धानंतरची ही रशियाच्या सोन्याच्या साठ्याची सर्वात नीचांकी पातळी आहे.**



### रशियाचा 'नाईलाज' अन् चीन उचलतोय फायदा!

खरे तर, रशिया नाईलाजाने सोने विकत आहे. मात्र चीन मोठ्या प्रमाणावर सोन्याची खरेदी करत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २०२५ च्या पहिल्या सहामाहीत रशियाकडून चीनला होणारी सोने आणि चांदीची निर्यात तब्बल ८० टक्क्यांनी वाढून १ अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. जागतिक पातळीवरील तणावामुळे गेल्या १२ महिन्यांत सोन्याच्या दरात ४३% वाढ झाल्याचे दिसून आले आहे. यामुळे जागतिक बाजारपेठेत सोन्याची मागणी वाढून भविष्यातही सोन्याच्या किमतीत चढ-उतार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पण रशिया एवढ्या मोठ्या प्रमाणावर सोने का विकत आहे? असा प्रश्न तुम्हाला नक्कीच पडला असेल... तर जाणून घेऊयात...

खरे तर, १९९८ च्या आर्थिक संकटानंतर रशिया पहिल्यांदाच एवढ्या वेगाने आपला सोन्याचा साठा रिकामा करत आहे. डिसेंबर २०२५ पासून आतापर्यंत रशियाने जवळपास ६२ टन सोने विकले आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे, रशियाची वाढती अर्थसंकल्पिय तूट आणि युक्रेन युद्धावर होणार प्रचंड खर्च. रशियाच्या २०२६ च्या एकूण बजेटपैकी तब्बल ३८% हिस्सा केवळ सैन्य आणि सुरक्षेवर खर्च होण्याचा अंदाज आहे.

महत्वाची गोष्ट म्हणजे, रशिया हा चीननंतरचा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा सोन्याचे उत्पादक करणारा देश आहे. जो दरवर्षी ३०० टनांपेक्षाही अधिक सोने काढतो. दरम्यान, रशियन नागरिकही सुरक्षित गुंतवणुकीचा पर्याय म्हणून मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करत आहेत. विशेष म्हणजे २०२४ मध्ये रशियन नागरिकांनी तब्बल ७५.६ टन सोने खरेदी केले होते. याशिवाय, आंतरराष्ट्रीय निर्बंधांमुळे रशियाला परदेशातून निधी उभारणे आणि आर्थिक व्यवहार करणे अधिक कठीण झाले आहे. त्यामुळे सरकारी खर्च भागवण्यासाठी सोन्याच्या साठ्याचा वापर हा रशियासाठी महत्त्वाचा आर्थिक पर्याय ठरत आहे. मात्र, सोन्याची विक्री वाढत राहिल्यास भविष्यातील आर्थिक संकटांचा सामना करण्यासाठी उपलब्ध असलेल्या रशियाच्या राखीव निधीवर दबाव वाढण्याची शक्यता आहे.

# वाढदिवसाच्या निमित्ताने चाहत्यांना मिळणार खास सरप्राईज

दाक्षिणात्य सुपरस्टार प्रभासच्या आगामी चित्रपटांची चाहत्यांमध्ये नेहमीच चर्चा असते. 'स्पिरिट' या बहुप्रतीक्षित चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर झाल्यानंतर आता त्याच्या 'फौजी' या चित्रपटाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. चित्रपटाचे पहिले पोस्टर समोर आल्यानंतर चाहत्यांची उत्सुकता वाढली होती. आता प्रभासच्या वाढदिवसाचे औचित्य साधत निर्माते 'फौजी'ची पहिली झलक प्रेक्षकांसमोर आणणार आहेत. प्रभासचा वाढदिवस २३ ऑक्टोबर रोजी असून, याच दिवशी 'फौजी' चित्रपटाचा खास प्रमोशनल व्हिडिओ प्रदर्शित केला जाणार आहे. या व्हिडिओतून चित्रपटाची कथा आणि प्रभास साकारत असलेल्या भूमिकेबद्दल प्रेक्षकांना माहिती दिली जाणार आहे. अलीकडेच मौली थनुजच्या 'डोंगा ना कोडुकू' या चित्रपटाच्या टीझर प्रदर्शनादरम्यान 'फौजी'विषयी चर्चा झाली. यावेळी निर्माता रवी शंकर यांना प्रभासच्या चित्रपटाबद्दल विचारण्यात आले. त्यावर त्यांनी प्रभासच्या वाढदिवसादिवशी 'फौजी'ची खास झलक प्रदर्शित होणार असल्याची माहिती दिली. रवी शंकर म्हणाले, 'या व्हिडिओमधून प्रेक्षकांना चित्रपटाच्या कथेविषयी आणि प्रभासच्या भूमिकेविषयी प्राथमिक माहिती मिळेल.' 'फौजी' या चित्रपटात प्रभास एका सैनिकाच्या भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन हनु राघवपुडी यांनी केले आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि युद्धाशी संबंधित कथानक असलेल्या या चित्रपटाबद्दल सुरुवातीपासूनच उत्सुकता निर्माण झाली आहे. काही दिवसांपूर्वी निर्मात्यांनी प्रभासचे एक पोस्टर शेअर केले होते. या पोस्टरमध्ये त्याच्या हातात बंदूक दिसत असून, त्याचे हात रक्ताने माखलेले आहेत. पोस्टरसोबत निर्मात्यांनी 'एकटी लढणारी बटालियन' असे कॅप्शन दिले होते. 'फौजी' हा चित्रपट सुरुवातीला डिसेंबर २०२६ मध्ये प्रदर्शित करण्याचा विचार होता. मात्र, नंतर प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली. आता हा चित्रपट मार्च २०२७ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची शक्यता आहे.






## एक अपूर्ण प्रेम कहाणी

मराठी मनोरंजनविश्वातील अभिनेत्री उर्मिला कानेटकर सध्या सोशल मीडियावरील तिच्या पोस्टमुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी तिने इन्स्टाग्रामवरील आपले नाव बदलल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर आता तिने शेअर केलेल्या एका व्हिडिओ क्लिपने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. उर्मिलाने 'ती सध्या काय करते' या मराठी चित्रपटातील एक भावनिक सीन आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केला आहे. या सीनमुळे चित्रपटातील अपूर्ण प्रेमकहाणी पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. उर्मिला कानेटकरने आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटच्या स्टोरीवर 'ती सध्या काय करते' या चित्रपटातील एका सीनची क्लिप शेअर केली. या सीनमध्ये अनुरागच्या आयुष्यात त्याचं शाळेतील प्रेम असलेली तन्वी पुन्हा येते. तन्वी अनुरागच्या घरी जाते. तिथे ती त्याच्या मुलीचं नाव विचारते. मात्र, मुलीचं नाव ऐकल्यानंतर ती आश्चर्यचकित होते.



## 'मला साखर आहे, गूळ कुठे आहे?'

आजोबा आणि नातवाच्या नात्यातील धमाल, मस्ती आणि भावनिक क्षण उलगडणारा 'आदि अनंत' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ आणि संकर्षण कऱ्हाडे ही अनोखी जोडी मोठ्या पडद्यावर एकत्र दिसणार आहे. चित्रपटाच्या ट्रेलरमधून या दोघांमधील गोड नात्याची झलक पाहायला मिळत असून, ही जोडी प्रेक्षकांच्याही पसंतीस उतरत आहे. ही गोष्ट केवळ एका चित्रपटातील आजोबा आणि नातवाची नसून, आपल्या घरातील आजोबा-नातवाच्या नात्याची आठवण करून देणारी आहे. दरम्यान, संकर्षण कऱ्हाडे यांनी एका कार्यक्रमात अशोक सराफ यांच्यासोबतच्या काही खास आठवणींना उजाळा दिला. त्यातील एका गंमतीशीर प्रसंगातून अशोक सराफ यांचा मिश्कील स्वभाव पुन्हा एकदा समोर आला. संकर्षण यांनी सांगितलेल्या आठवणीपैकी एक किस्सा आहे परभणीतील. एका कार्यक्रमानिमित्त अशोक सराफ परभणीला आले होते. त्यावेळी संकर्षणच्या आईने सर्वांना घरी जेवायला बोलावण्यास सांगितले. त्यानुसार संकर्षण अशोक सराफ, निवेदिता सराफ आणि इतर सहकाऱ्यांना घरी जेवायला घेऊन आला. संकर्षणच्या आईने खास गुळपोळी केली होती. अशोक सराफही गुळपोळीचा मनमुराद आस्वाद घेत होते. तेव्हा निवेदिता सराफ यांनी त्यांना थांबवत, "अशोक, तुला साखर आहे, जरा कंट्रोल ठेव,"असे सांगितले. त्यावर अशोक सराफ यांनी क्षणाचाही विलंब न लावता, "अगं, मला साखर आहे, गूळ कुठे आहे?" असे मिश्कील उत्तर दिले. त्यांच्या या उत्तरातून त्यांच्या विनोदबुद्धीची सहज झलक पाहायला मिळाली.

# टीम इंडियाचा ऐतिहासिक विजय!

## श्रेयस अय्यर आणि नमन धीरच्या दमदार फलंदाजीने भारताची मालिकेत १-० ने आघाडी

**महाईन्यूज । क्राइस्टचर्च**

**भारतीय संघाने दमदार विजयासह न्यूझीलंड दौऱ्याची सुरूवात केली आहे. क्राईस्टचर्चच्या मैदानावर पार पडलेल्या सामन्यात न्यूझीलंडकडून ग्लेन फिलिप्सने ८२ धावांची वादळी अर्धशतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर न्यूझीलंडने पहिल्या डावात २२५ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाकडून संजू सॅमसनने ६७ धावांची खेळी करून दमदार सुरूवात करून दिली. शेवटी श्रेयस अय्यरने ४२ आणि नमन धीरने ४२ धावांची खेळी करून भारतीय संघाला ४ गडी राखून विजय मिळवून दिला. यासह भारतीय संघाने ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे.**



### मालिकेतील दुसरा सामना कधी?

मालिकेतील पहिला सामना जिंकल्यानंतर आता भारतीय संघ दुसरा सामना जिंकून मालिकेवर पकड मजबूत करण्याच्या प्रयत्नात असणार आहे. मालिकेतील दुसरा टी-२० सामना रविवारी २४ ऑक्टोबरला खेळवला जाणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी १२:३० वाजता सुरू होणार आहे.

भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी २२६ धावांचा डोंगर सर करायचा होता. या आव्हानाचा यशस्वी पाठलाग करण्यासाठी भारतीय संघाला चांगल्या सुरूवातीची गरज होती. अशी सुरूवात संजू सॅमसनने करून दिली. त्याने ३३ चेंडूंमध्ये ६७ धावांची वादळी खेळी केली. तर अभिषेक शर्मा २९ धावांवर माघारी परतला. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ९३ धावा जोडल्या. तिलक वर्मा आणि इशान किशन दोघेही या सामन्यात फ्लॉप ठरले. तिलक ६ तर इशान १ धाव करून माघारी परतला. शेवटी श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलने मिळून डाव सावरला. अक्षर पटेल २४ धावा करून तंबूत परतला. तर श्रेयस अय्यरने ४२ धावांची खेळी केली. तर नमन धीरनेही नाबाद ४२ धावांची खेळी केली.

या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजी करण्याचे आमंत्रण दिले होते. या आव्हानाचा स्वीकार करून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या टीम सेफर्ट आणि फिन ॲलेन या जोडीने पहिल्या विकेटसाठी ४९ धावा जोडल्या. सेफर्टने २४ धावा केल्या. तर फिन ॲलेनने ४५ धावांची खेळी केली. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना डॅरिल मिशेलने २८ धावांची खेळी केली. शेवटी बेवन जेकब्स आणि ग्लेन फिलिप्सने महत्वपूर्ण भागीदारी केली. पण अर्शदीप सिंगच्या चपळतेमुळे जेकब्स ३१ धावांवर धावबाद होऊन माघारी परतला. तर ग्लेन फिलिप्स ८२ धावांवर नाबाद राहिला आणि न्यूझीलंडला २२५ धावांवर पोहोचवलं.

## हॅरी ब्रूकने झळकावलं वनडेतलं सगळ्यात वेगवान द्विशतक; गिलचा मोडला विक्रम

**महाईन्यूज । रावळपिंडी**

**रावळपिंडीत इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूकने चौकार, षटकारांचा पाऊस पाडत अद्भुत अशी द्विशतकी खेळी साकारली. पाकिस्तानात अफलातून कामगिरी नावावर असणाऱ्या ब्रूकने तिरंगी मालिकेतल्या श्रीलंकेविरुद्धच्या लढतीत २१ चौकार आणि १० षटकारांसह २०२ धावांची तडाखेबंद खेळी साकारली. अवघ्या ११४ चेंडूत द्विशतकाला गवसणी घालत ब्रूकने नवा विक्रम नावावर केला. ब्रूकने शुबमन गिलचा विक्रम मोडला. ब्रूकचं वनडेतलं हे चौथं शतक आहे.**




वनडे क्रिकेटमधलं हे १४वं वैयक्तिक द्विशतक आहे. वनडेत इंग्लंडच्या क्रिकेटपटूने झळकावलेलं हे पहिलंच द्विशतक आहे. कर्णधाराने साकारलेलं हे चौथं द्विशतक आहे. द्विशतकी खेळीसह ब्रूक, रोहित शर्मा, शुबमन गिल, वीरेंद्र सेहवाग यांच्या मांदियाळीत सामील झाला आहे. पाकिस्तानात झळकावलेलं हे पहिलंच वनडे द्विशतक आहे. सर्वसाधारणपणे सलामीवीरांना द्विशतक झळकावण्याची सर्वोत्तम संधी असते कारण त्यांना बरीच षटकं खेळायला मिळतं. चौथ्या क्रमांकावर खेळायला आलेल्या ब्रूकने पहिल्या चेंडूपासून आक्रमणावर भर दिला. फलंदाजीला पोषक खेळपट्टीवर ब्रूकने श्रीलंकेच्या गोलंदाजांना निष्प्रभ केलं. २०२ धावांपैकी १४४ धावा ब्रुकने चौकार-षटकारातून वसूल केल्या. ब्रुकची खेळी इंग्लंडसाठीची वनडेतली सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे.

ब्रुकने पहिल्या २४ चेंडूत फक्त १३ धावा केल्या. पुढच्या ५१ चेंडूत त्याने शतक पूर्ण केलं. पुढच्या २२ चेंडूत दीडशतक गाठलं. पुढच्या १७ चेंडूत त्याने द्विशतकाला गवसणी घातली. टेस्ट क्रिकेटमध्ये ३००, वनडेत २०० आणि टी२० क्रिकेटमध्ये १०० करणारा हॅरी ब्रूक केवळ दुसरा फलंदाज आहे.

श्रीलंकेचा कर्णधार कुशल मेंडिसने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला. हा निर्णय श्रीलंकेसाठी दुस्वप्न ठरला. इंग्लंडच्या फलंदाजांनी चौकार षटकारांची टांकसाळ उघडली. इंग्लंडने ४२९ धावांचा डोंगर उभारला. टॉम बँटन आणि बेन डकेट यांनी ५० धावांची सलामी दिली. यानंतर बँटन बाद झाला. डकेटला रूटने चांगली साथ दिली. अनुभवी जो रूट मोठी खेळी साकारणार असं वाटत असतानाच बाद झाला. त्याने ६९ धावांची खेळी केली. रुट-ब्रूक जोडीने तिसऱ्या विकेटसाठी १२७ चेंडूत १५९ धावांची भागीदारी केली. रूट बाद झाल्यानंतर ब्रुकला विल जॅक्सने तोलामोलाची साथ दिली. ब्रुक-जॅक्स जोडीने चौथ्या विकेटसाठी ७९ चेंडूत १८५ धावांची मॅरेथॉन भागीदारी केली. ब्रुकने श्रीलंकेच्या प्रत्येक गोलंदाजाला लक्ष्य करत खोऱ्याने धावा लुटल्या.


YOU
CHOOSE
WE CARE
Consult with our experts now!
Orthopedic and Joint Care
Laboratory Services
24/7 Emmergency Care
128 Slice CT Sacn
3 Tesla MRI
Neuro and Spine Care
020-67313000 / +91 98220 55986
Sainath Hospital, Sant Nagar, Sector no. 4, Moshi Pradhikaran, Pune - Nashik Highway, Pune 412105
SAINATH HOSPITAL
Assuring Quality Care
Center Of Excellence For Trauma & Joint Replacement Surgery
www.sainathhospital.com

# पिंपरी चिंचवड आणि मावळमध्ये सायबर सुरक्षिततेचा जागर

## सायबर शिका, सायबर सुरक्षित राहा! सार्वजनिक ठिकाणी नागरिकांना सायबर सुरक्षेचा संदेश

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**वाढत्या डिजिटल युगात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असताना नागरिकांमध्ये सायबर सुरक्षिततेविषयी जागरूकता निर्माण करणे काळाची गरज बनली आहे. या पार्श्वभूमीवर प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज, चिंचवड आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'या राष्ट्रीय उपक्रमांतर्गत कमला एज्यूकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा, खजीनदार डॉ. भूपाली शहा, संचालिका डॉ. तेजल शहा, समन्वयीका डॉ. हर्षिता वाच्छानी, क्वीक हिल फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, संचालक अजय शिर्के, दिपू सिंग, गायत्री केसरकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सायबर योध्दा विद्यार्थ्यांनी पंधरा दिवसांचा जनजागृती अभियान विविध ठिकाणी राबविला.**



पिंपरी येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्राचार्य ए.के. जाधव, दामोदर चापेकर, काळभोर नगर, रूपी नगर येथील तृतीय पंथीय समुदाय, भाजी विक्रेते, नागरीक, विद्यार्थी, औद्योगिक क्षेत्रातील लधू उद्योग संस्थेतील कामगार या जनसमुदायाना मार्गदर्शन, प्रशिक्षण देवून जनजागृती केली.

मावळ परिसरातील सातेगाव गावाच्या सरपंच ज्योती आगालमे, उपसरपंच वैशाली आनंद याच्या मार्गदर्शनाखाली गावातील धरोधरी जनसमुदायामध्ये प्रतिभा महाविद्यालयाच्या सायबर सेलच्या अध्यक्षा स्नेहा तेली , पदाधिकारी सिमरन यादव, पियुषा रोहम, साकिब चौधरी, प्रज्ञा गावडे, फैसल खान सायबर योध्दानी भव्य सायबर जनजागृती मोहीम राबविली. धरोधरी सर्वे करून मोबाईल तपासणी केली व सायबर मुक्त प्रमाण पत्राचे वाटप समन्वयीका डॉ. हर्षिता वाच्छानी, सरपंच ज्योती आगालमे आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट नागरिकांना ऑनलाइन फसवणूक, आर्थिक लूट, समाज माध्यमांचा गैरवापर आणि वैयक्तिक माहितीच्या चोरीसारख्या धोक्यांपासून सावध करणे हा होता. महाविद्यालयातील प्रशिक्षित 'सायबर योध्दा ' विद्यार्थ्यांनी सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, बस स्थानके आणि गर्दीच्या ठिकाणी जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधला.

यावेळी सायबर योध्दानी तेथील नागरीक, महिला , विद्यार्थी , जेष्ठ नागरीक आदीना अनोळखी लिंक आणि मेसेजपासून सावध राहा - कोणत्याही अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या संशयास्पद लिंकवर क्लिक करू नका.

ओटीपी आणि बँक माहिती गोपनीय ठेवा बँक कधीही फोनवर ओटीपी, पासवर्ड मागत नाही, ही माहिती कोणालाही देऊ नका. मजबूत पासवर्डचा वापर साधा पासवर्ड टाळून अक्षरे, आकडे आणि चिन्हांचा वापर करून मजबूत पासवर्ड तयार करा. सोशल मीडियावर प्रायव्हसी बाबत आपली वैयक्तिक माहिती, लोकेशन आणि फोटो अनोळखी व्यक्तींसोबत शेअर करू नका. त्वरित तक्रार सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या राष्ट्रीय सायबर हेल्पलाईनवर किंवा http://www.cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवा.

प्रतिभा महाविद्यालयातील सायबर योध्दा विद्यार्थी केवळ वर्गातील शिक्षणापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत डिजिटल साक्षरतेचा संदेश घरोघरी पोहोचविण्याचा प्रयत्न केला, याचे नागरिकांनी देखील कौतुक केले. या बाबतीत संस्थाचालक डॉ. दीपक शहा, प्राचार्या डॉ क्षितीजा गांधी, उपप्राचार्या डॉ जयश्री मुळे, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरीया आदीनी या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, संवाद कौशल्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना अधिक दृढ झाली. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाच्या माध्यमातून सुरक्षित, सतर्क आणि सक्षम डिजिटल समाज निर्मितीचा संकल्प प्रतिभा कॉलेज आणि क्विक हील फाउंडेशनने केला असून, सायबर सुरक्षितता ही केवळ गरज नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हा मोलाचा संदेश व पंधरा दिवसाच्या जनजागृती अभियान या मोहिमेतून देण्यात आला. या बद्धल सायबर योध्दातील सहभागी विद्यार्थ्याचे डॉ. दीपक शहा व आदीनी कौतूक केले.

## पीसीयूची शैक्षणिक गुणवत्ता आणि उद्योग क्षेत्राशी समन्वय ठेवण्याची बांधिलकी; कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**





**पिंपरी चिंचवड विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता, तांत्रिक प्रगती आणि उद्योग क्षेत्राशी अर्थपूर्ण समन्वय ठेवण्याची बांधिलकी असल्याचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे एआय उदयोन्मुख तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी राष्ट्रीय आयइइइ परिसंवादात उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. सोनवणे बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, एमआयटी विद्यापीठ, सिम्बायोसिस विद्यापीठ, टी. बी. सानस महाविद्यालय, डी. वाय. पाटील विद्यापीठ कोल्हापूर, एआयएसएसएमएस, सिंहगड इन्स्टिट्यूट आणि संदिप विद्यापीठ यांसह विविध शैक्षणिक संस्थांतील ११० प्रतिनिधी सहभागी झाले होते.

"एआय चलित अभियांत्रिकी शिक्षण" या चर्चेत उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. उच्च तंत्रज्ञान देवाणघेवाण, उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा अभ्यास आणि उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ करण्याबाबत, एआय आधारित उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि त्यांचे व्यावहारिक उपयोग यावर तज्ञांनी चर्चा केली. तांत्रिक ज्ञानाची देवाणघेवाण आणि विविध शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, पीसीयू व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. कुलसचिव डॉ. अनिल माहेश्वरी, अधिष्ठाता डॉ. सचिन पवार, पीसीयू संचालक, संशोधन व विकास संचालक डॉ. भारत काळे, आंतरराष्ट्रीय संबंध संचालक डॉ. शंकर देवसरकर, इनक्युबेशन व नवोपक्रम, संचालक डॉ. प्रणव चरखा, आंतरराष्ट्रीय संबंध केंद्र संचालक डॉ. विजय पाटील, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अधिष्ठाता डॉ. जयदीप पाटील, संगणक विज्ञान व अभियांत्रिकी डॉ. अमित गाडेकर यांचेही मार्गदर्शन लाभले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सॉफ्टवेअर अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञांना एकत्र आणून या उपक्रमात विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना उदयोन्मुख तंत्रज्ञानाशी परिचित होण्याची तसेच त्याच्या व्यावहारिक उपयोगांचे आकलन करण्याची मौल्यवान संधी मिळाली.

# प्रत्येक व्यक्ती एक स्वतंत्र व्यक्तिमत्व; डॉ. कांचन देशपांडे

## पीसीसीओईमध्ये 'मी... माझा प्रवास, अनेक भूमिका आणि सुवर्णमध्य' चर्चासत्र उत्साहात संपन्न

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**प्रत्येक व्यक्तीचे एक स्वतंत्र व्यक्तिमत्व असते. आपण प्रथम ध्येय ठरवून नियोजन करावे. सर्जनशीलतेचा वापर करून आत्मविश्वासाने सकारात्मक प्रयत्न केले की यश निश्चित मिळते असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. कांचन देशपांडे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधील अंतर्गत तक्रार समितीच्या वतीने 'मी... माझा प्रवास, अनेक भूमिका आणि सुवर्णमध्य' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सिटी प्राईड स्कूलच्या प्राचार्य डॉ. कांचन देशपांडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. कायदा सल्लागार ॲड. परिक्रमा खोत, स्त्री रोग तज्ञ डॉ. क्षमा उपलेंचवार, न्यू एज फायर फायटिंग कंपनी संचालक सुजल शाह, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक निळकंठ चोपडे, अंतर्गत तक्रार समिती उपाध्यक्ष सहा. प्रा. वृषाली भालेराव, अधिष्ठाता डॉ. शीतल भंडारी आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील उद्योजक नरेंद्र लांडगे अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते.

डॉ. क्षमा उपलेंचवार यांनी सांगितले की, अनेक स्त्रिया कुटुंबाची जबाबदारी घेऊन नोकरी, उद्योग व्यवसाय करतात. हे करत असताना त्यांना चिंता, ताणतणाव याचा सामना करावा लागतो, ही समाज व्यवस्था स्त्रियांशिवाय अपुरी आहे. त्यांच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे येतात. कुटुंबात प्रत्येक नात्याची तसेच नोकरी व्यवसायात प्रत्येक पदाची वेगळी जबाबदारी त्यांना घ्यावी लागते. 'यश' म्हणजे काय, हे शोधून काढा. स्वतःला प्रश्न विचारा, तुमच्या कामात आणि वैयक्तिक आयुष्यात योग्य समतोल ठेवा आणि आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका असे आवाहन डॉ. क्षमा उपलेंचवार यांनी केले.

ॲड. परिक्रमा खोत यांनी सांगितले की, जे तुम्हाला योग्य वाटत नाही, त्याविरुद्ध नेहमी आवाज उठवा. केवळ चर्चा करून समानता येत नाही. जिथे गरज वाटेल, तिथे संघर्ष करायला हवा. बदलाची सुरुवात आपल्या घरापासून व्हायला हवी.

उद्योजिका सुजल शहा यांनी सांगितले की, तुम्हाला तुमचा मार्ग स्वतःच तयार करावा लागतो. आयुष्य नेहमीच सकारात्मक नसते, आपल्याला नकारात्मकतेलाही सामोरे जावे लागते. नोकरी आणि वैयक्तिक आयुष्य याचा समन्वय साधता आला पाहिजे.

प्रास्ताविक करताना अंतर्गत तक्रार समिती उपाध्यक्ष सहा. प्रा. वृषाली भालेराव यांनी सांगितले की, महिलांना वैयक्तिक आयुष्यात समतोल राखताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. यावर महिलांचे विचार मंथन व्हावे त्यासाठी पीसीसीओई ने खुले व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे.

डॉ. वृषाली भालेराव, डॉ. शिल्पा मोटेगावकर यांनी संयोजनात सहभाग घेतला. स्वागत,प्रास्ताविक डॉ. प्रा. शीतल भंडारी, सूत्र संचालन स्नेहा कल्याणकर, आभार डॉ. सोनल गोरे यांनी मानले.

# खराबवाडीत रोलरच्या धडकेत कामगाराचा मृत्यू

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**




खेड तालुक्यातील खराबवाडी गावाच्या हद्दीत नवीन मदरसन कंपनीच्या बांधकामस्थळी रोलरच्या धडकेत कैलास रमेश कोकरे (वय ३२) यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलिस ठाण्यात रोलरचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास ही दुर्घटना घडली. आरोपी चालक भिमराव यशवंत वैद्य (वय ३३, रा. चांडोली खुर्द, ता. आंबेगाव, जि. पुणे; मूळ रा. ब्राह्मणवाडा, ता. सेनगाव, जि. हिंगोली) हा जेसीबी कंपनीचा व्हीएम ११७ मॉडेलचा रोलर (एमएच १४ एलई ५८७५) चालवत होता. त्याने वाहन चालवताना निष्काळजीपणा केल्याने तसेच वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्याने अपघात झाला. या अपघातात कैलास कोकरे यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा मृत्यू झाला, असे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी २१ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२.१० वाजता उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १८२/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०६(१) आणि २८१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्रा. रुपाली राजेश जगनाडे (हुलावळे) यांना भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**तळेगाव दाभाडे येथील नूतन महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या प्राध्यापिका प्रा. रुपाली राजेश जगनाडे (हुलावळे) यांना छत्तीसगड येथील कलिंगा विद्यापीठ, रायपूर यांच्याकडून भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी डॉ. अलोके वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आपले संशोधन यशस्वीरीत्या पूर्ण केले.त्यांच्या संशोधनाचा विषय "अर्धसंवाहकांमध्ये संक्रमण धातूंचे डोपिंग करून नवीन प्रकाशीय व विद्युत गुणधर्मांचे अनुकूलन, संश्लेषण आणि वैशिष्ट्यीकरण" हा होता.**



या संशोधनाचा मुख्य उद्देश संक्रमण धातूंच्या डोपिंगद्वारे अर्धसंवाहक पदार्थांच्या प्रकाशीय व विद्युत गुणधर्मांचा अभ्यास करून त्यांचे अनुकूलन करणे हा होता. नॅनोपदार्थ, अर्धसंवाहक पदार्थ, प्रकाशीय व विद्युत गुणधर्म, संक्रमण धातूंचे डोपिंग तसेच पदार्थांचे संश्लेषण व वैशिष्ट्यीकरण ही त्यांच्या संशोधनाची प्रमुख क्षेत्रे आहेत.

प्रा. रुपाली जगनाडे (हुलावळे) या अध्यापनासोबतच संशोधन क्षेत्रातही सक्रिय असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत असतात.

त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय बाळा भेगडे, उपाध्यक्ष नंदकुमार शेलार, सचिव संतोष खांडगे, खजिनदार तसेच अभियांत्रिकी कार्यकारी समितीचे अध्यक्ष राजेश म्हस्के, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रमोद पाटील, विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापकवर्ग, सहकारी, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ५०१ महिलांच्या महाआरतीने कासारवाडी दुमदुमली!

## शितळादेवी मित्र मंडळ व शिवस्पर्श प्रतिष्ठानचा ऐतिहासिक सोहळा संपन्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शितळादेवी मित्र मंडळ आणि शिवस्पर्श प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने कासारवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य महाआरती सोहळ्यात ५०१ महिलांनी एकत्र येऊन अत्यंत भक्तिभावाने महाआरती केली. या अभूतपूर्व आणि मंगलमय सोहळ्यामुळे संपूर्ण कासारवाडी परिसर देवीच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.**





भव्य सहभाग: या विशेष महाआरतीत परिसरातील तब्बल ५०१ महिलांनी पारंपारिक वेशभूषेत शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग घेतला होता.

मंगलमय वातावरण: सायंकाळच्या सुमारास दीपप्रज्वलन आणि मंत्रोच्चारांच्या गजरात जेव्हा ५०१ दिव्यांनी आरती सुरू झाली, तेव्हा उपस्थितांच्या अंगावर काटा आणणारे भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

आयोजकांचे नियोजन: शितळादेवी मित्र मंडळ आणि शिवस्पर्श प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत नेटके आणि शिस्तबद्ध केले होते, ज्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

"महिलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या धार्मिक कार्यक्रमाला एक ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झाले आहे. धर्म आणि संस्कृतीच्या जतनासाठी अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे," अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

महाआरती संपल्यानंतर उपस्थित महिला आणि नागरिकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या नेत्रदीपक सोहळ्याची प्रचिती घेण्यासाठी आणि दर्शन घेण्यासाठी कासारवाडी परिसरामधून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.




## जीएसटीची रक्कम न भरता व्यापाऱ्याची ३४.९६ लाखांची फसवणूक

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

जीएसटीची रक्कम शासनाकडे जमा न करता ती स्वतःकडे ठेवल्याचा आरोप करत एका व्यापाऱ्याची ३४ लाख ९६ हजार ९६३ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध संत तुकारामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सन २०२० ते नोव्हेंबर २०२३ या कालावधीत घडल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या प्रकरणी राजा ओमप्रकाश गोधवाणी (वय ४६, व्यवसाय – व्यापार, रा. वैभवनगर, पिंपरी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांचे आंबेडकर चौकातील डी.सी. चेंबर येथे 'न्यू अशोक मोटर पार्ट्स' नावाचे दुकान आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जब्बार शयफुद्दीन पटेल (वय ३२, रा. दगडू पाटीलनगर, थेरगाव) हा फिर्यादीच्या दुकानातील अकाउंटिंग आणि जीएसटी भरण्याचे काम पाहत होता. त्याने मकरंद अनिल घेवारी यांच्याशी संगनमत करून संबंधित जीएसटीची रक्कम शासनाकडे जमा न करता स्वतःकडे ठेवल्याचा आरोप आहे.

आरोपींच्या संबंधित फर्मच्या जीएसटीपोटी ९ लाख २७ हजार १६२ रुपये तसेच सेवन स्टार इंडस्ट्रियल सप्लायर या फर्मच्या जीएसटीपोटी २५ लाख ६९ हजार ७९४ रुपये अशी एकूण ३४ लाख ९६ हजार ९५६ रुपयांची रक्कम जमा न केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी संत तुकारामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५५८/२०२६ अन्वये भारतीय दंड विधानाच्या कलम ४२०, ४०६ आणि ३४ नुसार २१ ऑक्टोबर २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

## प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत प्रशिक्षण सत्राचे आयोजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या (PCMC) स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण सत्रासाठी महानगरपालिकेच्या प्रशिक्षिका श्रीमती उषा वानरे उपस्थित होत्या.**




त्यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत स्वच्छ आणि निरोगी समाजाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे आवाहन केले. सत्रादरम्यान परिसर स्वच्छ ठेवणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

ओला व सुका कचरा वेगवेगळा जमा करणे आणि कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे यावर विशेष भर देण्यात आला. प्लास्टिकचा अनावश्यक वापर टाळणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि स्वच्छतेच्या चांगल्या सवयी दैनंदिन जीवनात अंगीकारणे याबाबतही माहिती देण्यात आली.

स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश या प्रशिक्षणातून देण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या घरापासून, वर्गखोलीपासून आणि शालेय परिसरापासून स्वच्छतेची सुरुवात करावी, असे आवाहन करण्यात आले.

स्वच्छतेच्या माध्यमातून रोगराई रोखणे आणि पर्यावरण संतुलित राखणे शक्य असल्याचे प्रशिक्षिका श्रीमती उषा वानरे यांनी स्पष्ट केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. स्वच्छ भारत अभियानाचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा प्रशिक्षण सत्रांचे महत्त्व अधोरेखित झाले.

प्रियदर्शनी स्कूल, मोशीच्या या उपक्रमातून स्वच्छ, सुंदर आणि निरोगी भारत घडविण्याच्या राष्ट्रीय अभियानाला हातभार लावण्यात आला. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे व्यवस्थापन, प्राचार्य आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षिका यांचे मनःपूर्वक कौतुक व अभिनंदन केले.